# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक २७.०५.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २६.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून १,२३,८४०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमांवर कारवाई करून, १,२१५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३३१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२०,२००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) जुनी कामठी पोलीसांची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २६.०५.२०२६ चे २०.३० वा. ते दि. २७.०५.२०२६ चे ०२.०० वा. चे दरम्यान, जुनी कामठी पोलीसांचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांनी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, भाजी मंडी, कुरेशी मोहल्ला, कामठी येथील १) चौधरी मस्जीद मागील मकबुल पहेलवान चे घराबाजुची मोकळी जागा २) फम्मो शेख यांचे रिकामे घराचे मागील बाजुस कंम्पाऊंडचे आंत ३) पटेल क्लीनीक समोरील रजा मैदानचे बाजुला एका लोखंडी टिनपत्राचे बंद गोडावुन येथे पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, त्या तिन्हीही ठिकाणी एकुण ८६ गोवंशीय लहान मोठी जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेल्याचे दिसुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता, कोणीतरी अज्ञात आरोपींनी गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण ८६ गोवंशीय जनावरे एकुण किंमती ८,६०,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गोसेवा समीती, गौशाला, लुंबीनी नगर, कामठी, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे जुनी कामठी येथे घटनास्थळावरील जागेचे/गोडावुन चे मालक व त्यांना मदत करणारे अज्ञात आरोपीविरूध्द मपोउपनि. मिना झाडे यांनी कलम ५(ब), ९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(अ), ११(१)(ह), ११(१)(आय), ११(१)(ड) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. डॉ. संदीप पखाले पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग), वपोनि. महेश आंधळे यांचे मार्गदर्शनाखाली, मपोउपनि. मिना झाडे, पोहवा. अभय मुन व त्यांचे सहकारी तसेच पोलीस नियंत्रण कक्ष येथील आरसिपी पथक व एस.आर.पि. एफ. तुकडीतील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे तहसिल :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २७.०५.२०२६ चे ०१.०५ वा. चे सुमारास, तहसिल पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, मिर्झा गल्ली, अग्रसेन भवन मागे एका बर्गमॅन मोपेड गाडीवरील ईसमांवर संशय आल्याने त्यांचा पाठलाग करून, त्यांना थांबविले व त्यांस त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांने त्यांचे नाव, आरीष खान वल्द रशिद खान, वय ४० वर्षे, रा., गांधीबाग खदान, तहसिल, नागपुर असे सांगीतले. त्यांची व त्याचे दुचाकीची झडती घेतली असता, दुचाकी क्र. एम.एच. ४९ बि.क्यु. ५३१० चे डिक्कीत ०१ लोखंडी हत्तीमार चाकु किंमती ५००/—रू. चा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन बर्गमॅन दुचाकी व चाकु असा एकुण किंमती ७०,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन संशयीतरित्या फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सफौ. अनिल ठाकुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसिल येथे पोउपनि. महेंद्र वासनिक यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २६.०५.२०२६ चे ००.३० वा. ते ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत, जयताळा, रमाबाई आंबेडकर नगर, फादर शाळेजवळ, एम.आय.डी.सी., नागपुर येथे राहणारे फिर्यादी कविराज प्रेमदास मेश्राम, वय ५२ वर्षे यांचे घराचे तळमजल्यावर सिलींगचे काम असल्याने ते तळमजल्याला कुलुप लावुन पहील्या माळ्यावर परीवारासह झोपले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे तळमजल्यावरील मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख १६,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,४६,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे पोउपनि. दिलीप थोरवे ९५२७४२७८४६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे लकडगंज</u> :—** दिनांक २७.०५.२०२६ चे ०१.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, क्रिष्णा भोजनालय समोरील फ्लायओव्हर चे खाली पिल्लर जवळ एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ६५ वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल नेले असता, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतक इसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे लकडगंज येथे संपर्क साधावा.

यांप्रकरणी फिर्यादी मोनिष शफी कुरेशी, वय २३ वर्षे, रा. भांडेवाडी, अमीना ईलेक्ट्रॉनिक जवळ, पारडी, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे लकडगंज येथे मपोउपनि. सोनल शिंदे ९८९२२६८६२४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे कळमना</u> :—** दिनांक २६.०५.२०२६ चे १५.०० वा. ते १५.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, कळमना फ्रुट मार्केट, खळा नं. ३ जवळ एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ५० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतक इसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे लकडगंज येथे संपर्क साधावा.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. हनुमंत इंगळे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** दिनांक २६.०५.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, प्लॉट नं. १०२, गाडगे नगर, खरबी रोड, धिरज भगत चे घरी किरायाने राहणारे फिर्यादीचे भाऊ नामे रवि सुभाष भालापुरे, वय ३६ वर्षे हे दिनांक २६.०५.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, राहते घरी कुलरमध्ये पाणी भरत असतांना, ईलेक्ट्रीक करंट लागल्याने बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना घरामालक व नातेवाईकांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.

यांप्रकरणी फिर्यादी प्रविण गोपालदास महंत, वय ५२ वर्षे, रा. साईबाबा नगर, खरबी रोड, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. निलेश दळवी ७०२०३६१३९६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**